# नव्या संदर्भात भरताचे नाट्यशास्त्र

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - केसरी वर्तमानपत्र, संपा. दीपक टिळक, १९८८, ३१ जानेवारी )

भरतमुनीच्या नाट्यशास्त्रास आशयाच्या अनेक पातळ्या आहेत. कारण संकलक, तत्त्वचर्चिक आणि क्रियादर्शक अशा तिन्ही भूमिका भरताने पार पाडलेल्या दिसतात.

तीन प्रयोगकलांच्या विविध अंगांचा गांभीर्याने आणि मूलभूत विचार करणारी शास्त्रपरंपरेतील सूक्ष्म विस्तृत आणि साहित्यिक रचना करणारा भरत तत्त्वचर्चिक होता, म्हणूनच विविध विषयांना स्पर्श करताना प्रत्यक्ष प्रयोगापासून अमूर्तीकरणाने हाती लागणारे निकष आणि उपपत्ती नाट्यशास्त्रात काहीशा थंड आत्मविश्वासाने समोर ठेवण्यात येतात. प्रत्यक्ष प्रयोग सुलभ आणि यशस्वी व्हावा म्हणून काय काय करावे ते निसंदिग्ध सूचनांच्या रूपाने सांगताना भरत क्रियादर्शकाची भूमिका पार पाडत असतो. इतर आणि परिवर्ती ग्रंथातील मजकूर आणि आशय एकत्र आणण्यात संकलनाचे काम अंगिकारलेले दिसते.

निदान काही प्रयोगकर्त्यांना भरत प्रत्यक्ष महत्त्वाचा, 'रेलेवंट' वाटतो, असे दिसते. भरताच्या आदेशाप्रमाणे आपण प्रयोग करतो असा त्यांचा दावा असतो. नृत्यकार आणि नाट्यदिग्दर्शकांनी भरतास अनुसरून आपापले प्रयोग सादर केले असल्याची उदाहरणे समोर ठेवली जातच असतात. तुलनेने पाहता भरतास अनुसरून संगीत सादर केल्याची उदाहरणे तुरळक दिसतात. संगीतकारांनी प्रस्तुत संदर्भात उत्साह का दाखवू नये, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. करण, चारी, मुद्रा वगैरेंपेक्षा जाति तापदायक का ठराव्या? कदाचित संगीतकलेच्या स्वरूपाशीच याचा संबंध पोहोचत असावा. नाट्याच्या कोंदणात अवतरलेली भरतप्रणीत संगीताची पुनर्निर्मिती कोमट वाटली हे ध्यानात घेण्यासारखे आहे.

पुनर्निर्मिती करणारे पुन:पुन्हा सप्रमाणता, अस्सलपणा वा विश्वसनीयतेचा उच्चार करीत असतात. आपल्या प्रयत्नांचा अस्सलपणा सिद्ध करण्याकरिता भरताची अवतरणे दिली जातात. आता प्रश्न असा की, प्रयोगाच्या संदर्भात, प्रयोग'पात्र' आहे हे सिद्ध करण्याकरिता सप्रमाणतेचा पाठिंबा पुरेसा समाधानकारक आहे का? सप्रमाणता हा व्याकरणिक निकष आहे आणि म्हणून त्याला अपेक्षित प्रतिसाद 'बरोबर-चूक' होय. सौंदर्याच्या निकषाऐवजी व्याकरणिक निकष वापरून कसे चालावे? समजा 'अ'ने भरतास अनुसरून प्रयोग केला आहे, असा दावा करून प्रयोगसिद्धी केली आणि हा दावा बरोबर नाही असे 'ब'ने सिद्ध केले तर एवढ्यावरून प्रयोगाचे यशापयश कसे प्रभावित व्हावे? मुद्दा असा की, सप्रमाणता खुद्दांत महत्त्वाची असते की वर्तमान बोधनास संपन्न केले तर तिचे महत्त्व सिद्ध होते? नाट्यात्म अनुभूती म्हणून विशिष्ट आविष्कार परिणामकारक आहे की नाही याची हमी भरताशी राखलेले इमान देऊ शकते काय? कलात्म अनुभूती अधिक संपन्न नसल्यास भरताशी काटेकोरपणे सप्रमाण राहूनही काहीतरी निराळे पाहिल्याचे समाधानच मिळणार! (आणि केवळ निराळेपणाचे कलात्ममूल्य सर्वमान्य नाही). मुद्दा असा की, प्रत्यक्ष महत्त्व, रेलेवंस सिद्ध करण्याकरिता सप्रमाणतेचा हवाला देणे तर्कसंगत नाही. निष्कर्ष असा की नाट्यशास्त्राच्या तीन पातळ्या ध्यानात न घेता सरसकटपणे त्याच्या प्रत्यक्ष महत्त्वाविषयी भूमिका घेणे शक्य नाही.

थोडक्यात असे नोंदविता येईल की, तात्त्विक ग्रंथ म्हणून पाहिल्यास नाट्यशास्त्रातील संकल्पना चर्चा, कार्यपुस्तिकेच्या पातळीवर त्यातील प्रयोगसंबद्ध सूचना आणि संकल्पनाच्या दृष्टीने त्यातील ऐतिहासिक आशय महत्त्वाचा ठरतो. संकल्पनांच्या

पातळीवर नाट्यशास्त्र सारतः वादग्रस्त राहाते. उदाहरणार्थ 'रस'चर्चा अजूनही असंख्य वर्षे चालू राहील. म्हणजे या पातळीवर भरत रेलेवंट राहतो. ऐतिहासिक संदर्भामुळे भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकांना नाट्यशास्त्र महत्त्वाचे आहे. कार्यपुस्तिकेच्या पातळीवर नाट्यशास्त्राची उपयुक्तता वादविषय बनते, असे म्हणता येईल. भरताची नाट्यदृष्टी अतिशय व्यापक असल्याकरणाने तो रेलेवंट आहे, असे म्हणण्यात येते. प्रयोगाकडे सर्व संभवनीय बाजूंनी पाहून, त्याच्या सर्व अवस्था विचारात घेऊन भरताने नाट्यशास्त्रीय व्यवस्था सिद्ध केली आहे, असे मत मांडले जाते. उदाहरणार्थ त्याने आपल्या प्रेक्षागृहात अभिनेत्यांना (प्रेक्षकांना नव्हे!) पुरेशी जागा ठेवली आहे. संगीत/ संगीतकारांसारख्या नाट्यप्रवाहनियंत्रकांना सुबुद्धपणे मध्यवर्ती स्थान दिले आहे. श्रोते, प्रेक्षक यांच्या अवधानरेषा नीट केंद्रीत होतील, अशी दृश्य-श्राव्य काळजी घेतली आहे इत्यादी. प्रस्तुत पातळी अनुभवजन्य विधानांची असल्याचे ध्यानात येईल. तेव्हा प्रत्यक्ष प्रयोग करून पाहिल्याशिवाय तरणोपाय नाही.

भरताच्या आजच्या उपयुक्ततेविषयी त्यामानाने अलीकडचा पण जोरदार युक्तिवाद सांस्कृतिक अंगाने केला जातो. भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकांना आणि विशेषतः मन चक्रावून टाकणाऱ्या लोकाविष्कारांची वगैरे तपासणी करणाऱ्यांना अनेकदा त्यात भरताचे प्रतिबिंब आढळले आहे. असे का व्हावे याची कारणे स्पष्टपणे नोंदलेली नाहीत, पण अंदाज करता येतो. मध्यंतरीच्या कालखंडात भरताची शिकवणूक अ-नागर वा पांढरपेशा नसलेल्या सामाजिक थरांपर्यंत पाझरली. प्रस्तुत थर सामान्यतः आणि अनेक कारणांमुळे बदलास तयार नसतात. परिणाम असा की, भरत त्यांच्यात शाबूत राहिला! पर्यायी भूमिका अशी की, भरताचे संपूर्ण विवरण विचारपात्र राहते कारण त्याची आंतरिक व्यापकता होय. भरताची प्रगल्भता, त्याचे शहाणपण खरे पाहता एकवटलेल्या सामाजिक शहाणपणाचा परिपाक होय. नाट्यशास्त्रास एकट्यादुकट्याच्या प्रतिभेचा आविष्कार मानणे योग्य नव्हे. मानवाचा स्वभाव गेल्या हजारो वर्षांत मूलतः बदलला नसल्याकारणाने समाजात भरत असतोच. (पांढरपेशांनी अनेक कारणांनी त्याला बाजूस सारण्याचा प्रयत्न केला ते सोडा!) आज भारतीय अस्मितेच्या शोधात असणाऱ्यांना अ-नागर इत्यादी सामाजिक थरांना समजून घेण्यासाठी भरत समजून घ्यावा लागतो, कारण त्यांचे सांस्कृतिक आविष्कार भरताने व्यापलेले आहेत.

काहीसे दोषैक दृष्टीने पाहिल्यास भरताच्या 'आज'पणाविषयी आणखी एक भूमिका आढळते. प्रस्तुत भूमिकेचे 'म्हणणे' असे की, भरताची उसनवारी करणे आज फायदेशीर आहे, परदेशातही त्याची चलती आहे. तेव्हा तसे करणे स्वाभाविक आहे. नवीनाची ओढ असलेल्या पाश्चात्य रंगपाईकांनी अनेक वाद जन्माला घातले, इतकेच नव्हे तर त्यानुसार प्रत्यक्षतः नाटके वगैरे सादर केली. वास्तववाद, न-नाट्यवाद, क्रूरनाट्य, विधिनाट्य, पथनाट्य, समूहनाट्य, तत्कालस्फूर्त नाट्य, संहितारहित नाट्य, अनेक माध्यमाधारित सादरीकरण इत्यादी. 'नाट्याचे पुढचे पाऊल ते हे!' असे म्हणून वादांच्या आश्रयाने एखादे नाटक उभे करावे तोपर्यंत आधारभूत वाद मागे पडलेला असतो! तेव्हा सुलभतेने उसनवारी करण्यास भरत बरा. पाश्चात्यांनाही तो आगळा-वेगळा भासण्याची अंगभूत सोय असतेच! म्हणजे पुढारलेपणाचे श्रेयही मिळते! प्रस्तुत भूमिकेतून जन्माला आलेल्या भरतप्रेमाने पैदा होणारा नाट्यरंग आणि संबंधित अनुभवाचा टिकाऊपणा किती हा प्रश्न राहतोच! - एकंदरीने चर्चा चालू राहावी इतक्या बाजू अस्तित्वात दिसतात. प्रयोगकलांना प्रभावित करणाऱ्या विचारसरणी कोणकोणत्या हे ओळखणे सोपे नसते, मग कोणत्या विचारसरणीचा प्रभाव पडावा याचा निर्णय घेणे तर सोडाच! कलाविषयक चळवळी केवळ कलाजाणिवेतून निर्माण होत नाहीत, झाल्या तरी टिकत नाहीत आणि टिकल्या तरी त्यांना वारंवार ठाम उभ्या राहणाऱ्या प्रयोगपरंपरेचा पाठिंबा लागतो. भरत काय किंवा ब्रेख्त काय त्यांना पुन्हा सांस्कृतिक परीक्षा द्याव्या लागतात हे सत्य आहे. राष्ट्रवाद वा आंतरराष्ट्रवाद यासाठी पुरेसे ठरत नाहीत.